**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक ३० मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **२१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सार्वजनिक वितरण प्रणालीमार्फत केरोसीनच्या वितरणासाठी केंद्र सरकारची परवानगी.**
2. **येत्या १ एप्रिलपासून देशभरात जनगणना २०२७ च्या प्रक्रियेला सुरुवात.**
3. **नवीन 'घनकचरा व्यवस्थापन नियम, 2026' १ एप्रिलपासून देशभरात लागू होणार.**
4. **आगामी काही तासांत नागपूरसह पूर्व विदर्भाच्या अनेक जिल्ह्यांमध्ये वादळ आणि हलक्या पावसाची शक्यता.**

---------------------------------------------------

केरोसिन वितरणाला परवानगी

सध्याच्या भू-राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सरकारने अधिसूचना जारी करुन २१ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत केरोसिन वितरणाला परवानगी दिली आहे. ज्या भागांमध्ये केरोसिनचा वापर बंद करण्यात आला होता, त्या भागात केवळ घरगुती वापरासाठी वितरकांना केरोसिन वितरणाची परवानगी देण्यात आली असल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने सांगितलं. ही सूचना तत्काळ आमलात आणण्यात आली आहे. या अधिसूचनेनुसार सार्वजनिक क्षेत्रातल्या तेल कंपन्यांना स्वत:च्या मालकीच्या विक्री केंद्रांवर पाच हजार लिटर केरोसिन साठवता येईल. वितरण प्रक्रिया वेगवान करण्यासाठी विक्रेते आणि वहातूकदारांना परवानाविषयक काही विशिष्ठ नियमांमधून सवलत देण्यात आली आहे. हा शासननिर्णय त्वरित प्रभावाने अमलात येणार असून पुढील दोन महिन्यांसाठी तो लागू राहील.

---------------------------------------------------

जनगणना

येत्या १ एप्रिलपासून देशभरात जनगणना २०२७ च्या प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. देशातली ही १६ वी आणि स्वातंत्र्यानंतरची ८ वी जनगणना असणार आहे. देशाचे महानिबंधक आणि जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार नारायण यांनी आज दिल्लीत

बातमीदारांशी बोलताना ही माहिती दिली. या प्रक्रियेअंतर्गत १ एप्रिल ते ३० सप्टेंबर या कालावधीदरम्यानच्या ३० दिवसांच्या कालावधीत राज्य सरकारं आणि केंद्रशासित प्रदेशांकडून घरांची यादी तयार करण्याचं काम केलं जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं. यंदाच्या जनगणना प्रक्रियेअंतर्गत पहिल्यांदाच स्वयं गणनेची सुविधा उपलब्ध करून दिली गेली आहे, याअंतर्गत घरांची यादी करण्याचं काम सुरू होण्यापूर्वीच्या १५ दिवसांच्या कालावधीत नागरिकांना ही सुविधा वापरता येणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. टेस्ट डॉट सेन्सस डॉट जीओव्ही हे  स्वयं गणनेसाठीचं पोर्टल १६ भाषांमध्ये उपलब्ध करून दिलं आहे अशी माहितीही त्यांनी दिली. जनगणनेसाठीच्या पहिल्या टप्प्यातल्या प्रश्नांची अधिसूचना आधीच जारी केली आहे, तर दुसऱ्या टप्प्यासाठीचे प्रश्न लवकरच प्रसिद्ध केले जातील असं ते म्हणाले. जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात जातिनिहाय गणना केली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

---------------------------------------------------

निर्मला सीमारामन

जागतिक अनिश्चितता असूनही भारतीय अर्थव्यवस्था मजबूत असून, रुपयाचं मूल्य बाजारावर आधारित असल्याचं अर्थमंत्री निर्मला सीमारामन यांनी सांगितलं. त्या आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात रुपयाच्या अवमूल्यनावर उपस्थित प्रश्नाला उत्तर देत होत्या. गेल्या पाच वर्षात देशात वित्तीय तूट स्थिर राहिली असल्याचं त्या म्हणाल्या-

***(होल्ड बाईट - अर्थमंत्री निर्मला सीतारामन ३० सेकंद)***

सरकार आणि चलनविषयक प्राधिकरणांचं दोन्ही परिस्थितीवर बारकाईने लक्ष असून, सामान्य जनतेच्या हिताचे रक्षण करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचं सीतारामन यांनी सांगितलं. दरम्यान, भारतीय रिझर्व्ह बँकेनं जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, ग्राहकांच्या माहितीची गोपनीयता राखणं बँकांवर बंधनकारक असल्याचं सीतारामन यांनी अन्य एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. आवश्यकतेनुसारच ग्राहकांची माहिती संकलित केली जाते आणि जेव्हा गरज असते, तेव्हाच ती संबंधित प्राधिकरणांशी सामायिक केली जाते, असं त्या म्हणाल्या.

---------------------------------------------------

विजय वडेट्टीवार

उद्योगांच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी बळकावल्या जात असल्याचा आरोप काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला. गडचिरोली

जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यातील १४ गावांतील जमीन अधिग्रहण प्रक्रियेला विरोध करत, शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय एक इंचही जमीन घेऊ देणार नसल्याचा इशारा त्यांनी दिला. जिल्ह्यातील केवळ ३०% जमीन शेतीयोग्य असताना आणखी ३३ गावे प्रभावित होऊन सुमारे ५० गावे ओसाड पडण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. एमआयडीसीसाठी दिला जाणारा ५ ते ८.५ लाख रुपयांचा मोबदला अपुरा असल्याचही त्यांनी सांगितल. उद्योगांना विरोध नसून ते पडीक जमिनीवर उभारावेत, तसेच स्थानिकांना रोजगार का मिळत नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. बळजबरीने जमीन घेतल्यास काँग्रेसकडून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला.

-------------------------------------------------

चंद्रशेखर बावनकुळे

दरम्यान महसूल विभागातील कथित भ्रष्टाचाराच्या आरोपांवर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांना ठोस पुरावे सादर करण्याच खुल आव्हान दिल. माध्यमांसमोर वक्तव्य करून काही साध्य होणार नसून, चौकशी हवी असल्यास पुरावे मुख्यमंत्र्यांकडे किंवा संबंधित यंत्रणेकडे द्यावेत, असं बावनकुळे म्हणाले. कोणताही अधिकारी दोषी आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल, असही त्यांनी सांगितल. महसूल विभागात पारदर्शकता वाढवण्यासाठी लवकरच महत्वपूर्ण बदल करण्यात येणार असल्याच त्यांनी नमूद केल.

-------------------------------------------------

घन कचरा

भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने 27 जानेवारी रोजी अधिकृत राजपत्राद्वारे घनकचरा व्यवस्थापन नियम, 2026 अधिसूचित केले. ही नियमावली घनकचरा व्यवस्थापन नियम, 2016 ची जागा घेणार असून, 1 एप्रिल 2026 पासून ते लागू होतील. सुधारित नियमांमध्ये चक्राकार अर्थव्यवस्था आणि कचरा निर्माण करणाऱ्याची विस्तारित जबाबदारी या तत्त्वांचा समावेश करण्यात आला असून, कचऱ्याचे कार्यक्षम विलगीकरण आणि व्यवस्थापन, यावर विशेष भर देण्यात आला आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम, 2026 अनुसार, घनकचऱ्याच्या उगमस्थानीच ओला कचरा, सुका कचरा, सॅनिटरी (जैविक) कचरा आणि विशेष काळजी आवश्यक असलेला कचरा, अशा चार गटात वर्गीकरण करणे अनिवार्य करण्यात आल आहे. तसेच मोठ्या प्रमाणात कचरा निर्मिती करणाऱ्या घटकांची स्पष्ट व्याख्या निश्चित करण्यात आली असून, या घटकांनी कचरा निर्मितीशी

निगडीत जबाबदारी पार पाडणे बंधनकारक असेल. यामुळे, निर्माण झालेला कचरा पर्यावरणदृष्ट्या सुयोग्य पद्धतीने संकलित केला जाईल, त्याची वाहतूक केली जाईल आणि त्यावर प्रक्रिया करणे अनिवार्य ठरेल. हे नियम, कचरा संकलन, वाहतूक, प्रक्रिया आणि विल्हेवाट, या घनकचरा व्यवस्थापनाच्या सर्व टप्प्यांचे एका केंद्रीय ऑनलाइन पोर्टलद्वारे ऑनलाइन ट्रॅकिंग आणि देखरेख करण्याची प्रक्रिया देखील कार्यान्वित करतील.

--------------------------------------------------

परिवहन सभापती पत्रकार परिषद

नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाद्वारे 1600 बस थांब्याचे काम हे निविदा प्रक्रियेच्या स्तरावर सुरू आहे. सध्या शहरातील कोराडी डेपो हा ई बस चार्जिंग स्टेशनच्या सुविधेसह चांगला विकसित झाला आहे. भविष्यातील नियोजन म्हणून शहरातील मोर भवन, पटवर्धन ग्राउंड आणि खापरी डेपोत देखील अश्याच सुविधा निर्माण करण्यात येतील असा मानस परिवहन समितीच्या सभापती मंगला खेकरे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला .नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाचा २०२५-२६ चा सुधारित आणि 2026-27 चा प्रस्तावित अर्थसंकल्प आज परिवहन व्यवस्थापक डॉ. मेघना वासनकर यांनी सभापती खेकरे यांना सादर केला. सन २०२५-२६ च्या आर्थिक वर्षाकरिता एकूण संचालन खर्च रुपये 350 कोटी अपेक्षित असून एकूण अपेक्षित उत्पन्न 190 कोटी इतके राहणार असल्याने या अर्थसंकल्पामध्ये 150 कोटी रुपये तूट ही मनपाच्या सहाय्य अनुदानातून प्रति पूर्ती मिळणे अपेक्षित असल्याचं वासनकर यांनी स्पष्ट केलं. शहरातील पंतप्रधान ई बसेस योजनेअंतर्गत 150 बसेस मंजूर झाल्या असून त्यामध्ये 75 बसेस कोराडी डेपो आणि उर्वरित 75 बसेस खापरी डेपो येथील वाहन तळावरून संचालित करण्याचे सुनिश्चित करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

--------------------------------------------------

अपघात

काँग्रेसचे खासदार डॉ.प्रशांत पडोळे यांच्या वाहनाला आज पहाटे नागपूर विमानतळाकडे जात असताना अपघात झाला.या अपघातातुन डॉ.प्रशांत पडोळे थोडक्यात बचावले. पडोळे यांच्या गाडीला ट्रकने धडक दिली असून गाडीचा समोरील भाग पूर्णतः उध्वस्त झाला आहे.

--------------------------------------------------

खेलो इंडिया

पहिल्या खेलो इंडिया आदिवासी स्पर्धा छत्तीसगडच्या रायपूरमध्ये सुरू आहेत. या स्पर्धेत महाराष्ट्राकडून यवतमाळच्या साक्षी बुरकुलेने भारोत्तोलनात ८६ किलो गटात, १५० किलो वजन पेलून सुवर्ण पदकाला गवसणी घातली.

---------------------------------------------------

हवामान

आगामी काही तासात विदर्भाच्या नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, बुलढाणा आणि वाशिम या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी पर्जन्यमान आणि पावसाच्या हलक्या सरी बरसण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. याशिवाय गोंदिया, भंडारा, वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यात देखील हलका पाऊस पडू शकतो. उद्या देखील पूर्व विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान कायम राहणार आहे. दरम्यान नागपुरात आज ३९ अंश सेल्सिअस इतकं कमाल आणि २२ पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान नोंदविण्यात आलं.

---------------------------------------------------